पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १३/१०/२०२०

# गडचिरोली पोलीस दलाच्या पुढाकाराने कृषीसंजीवनी उपक्रम संपन्न

- **९५ शेतकऱ्यांनी नोंदविला सहभाग**

दुर्गम व अतिदुर्गम असलेल्या गडचिरोली जिल्हात परंपरागत पध्दतीने शेती केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचा मोबदला योग्यरित्या मिळत नसल्याने वर्षभर आर्थिक अडचणीत जीवन जगावे लागते. त्यातच नक्षलवादी जनतेला शासकीय योजनांचा लाभ घेण्यास विरोध करतात. त्यामुळेच सर्वसामान्य गरिब जनतेपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहचविण्यासाठी गडचिरोली पोलीस दल विविध उपक्रम राबवित असते. याचाच एक भाग म्हणुन मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सो. यांचे मार्गदर्शनाखाली गडचिरोली पोलीस दलातर्फे उपविभाग धानोरा अंतर्गत येणाऱ्या पोमके येरकड, मुरुमगाव, सावरगाव, कटेझरी, ग्यारापत्ती हद्दीतील अतिसंवेदनशिल गावात कृषी विभाग व आत्मा यांच्या मदतीने कृषी संजीवनी उपक्रम राबविण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना आधुनिक शेती पध्दतीचे धडे देवुन त्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवुन आणण्यासाठी पोलीस विभाग व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमातुन **ॲग्रीकल्चरल टेक्नॉलाजी मॅनेजमेंट ऍजन्सी** अंतर्गत शेतकरी गट तयार करण्यात आले असुन, प्रत्येक गटामध्ये १५ ते २० शेतकऱ्यांचा सहभाग आहे. अशा प्रकारे एकुण ९५ शेतकऱ्यांनी कृषी संजीवनी उपक्रमात आपला सहभाग नोंदविला आहे. या गटातील शेतकऱ्यांना शेती तंत्रज्ञानाच्या आधुनिक पध्दती व शेवगा शेती लागवड तसेच व्यवस्थापनाबाबत कार्यशाळा घेवुन गटातील शेतकऱ्यांना प्रायोगिक तत्वावर शेवगा लागवडीबाबत प्रोत्साहन देण्यात आले. पोलीस मदत केंद्रामध्ये नर्सरी तयार करुन ७,००० हजार रोपे तयार करण्यात आले. या रोपांचे वाटप गटातील सहभागी ९५ शेतकऱ्यांना करण्यात आले असुन, या रोपांची लागवड शेतकऱ्यांनी आपल्या शेतात केली आहे. आगामी काळात तयार होणाऱ्या उत्पन्नास शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळवुन देण्यासाठी पोलीस विभाग व कृषी विभाग प्रयत्नशील आहे. त्यासोबतच विविध शासकीय योजनांचे लाभ मिळवुन देत भाजीपाला, फळपिके, वनौषधी यांची रोपे तयार करुन वाटप करणे व आधुनिक तंत्रज्ञान व सुधारीत पिक पध्दतीबाबत शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

सदर कृषी संजीवनी उपक्रमाच्या यशस्वीतेकरीता गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी धानोराचे श्री. विक्रांत गायकवाड व आत्मा संस्थेचे प्रकल्प संचालक श्री. संदिप कराडे तसेच तालुका कृषी अधिकारी श्री. आनंद पाल व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री. संजय टेंभुर्णे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. सदर उपक्रमातील सहभागी शेतकऱ्यांचे मा. पोलीस अधीक्षक श्री अंकित गोयल सो. यांनी कौतुक केले आहे.









पोमके अधिकारी, कर्मचारी तसेच कृषी विभा
कर्मचारी यांचे उपस्थिती मध्ये



शेती माहिती पुस्तिका व रो
पाहुण्यांचे हस्ते वितरण। करताना